लोकमत ५.५.१७ पृ. १

# रक्कम दुप्पट करण्याचे आमिष दाखवून फसवणूक

## आरोपींच्या शोधात नालासोपारा पोलिस

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : कंपनीत गुंतवणूक केलेल्या रकमेवर दुप्पट रक्कम देण्याचे आमिष दाखवून ४२ नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या दोन फरारी आरोपींच्या शोधात नालासोपारा पोलिस आहेत.

निळेमोरे येथील श्रीपाल प्लाझा इमारतीमधील टीम मासन लाईफकेअर अँड टुरिझम कंपनीचे संचालक संतोष विश्वकर्मा व मीरा शर्मा यांनी कंपनीत गुंतवणूक केल्यावर त्या आयडीवर मोफत पर्यटन टूरवर जाण्याचे आमिष दाखवले होते. एका वर्षात गुंतवणुकीच्या दुप्पट रक्कम मिळेल, असे आमिष दाखवून गुंतवणूक करण्यास नागरिकांना सांगितले. ४२ नागरिकांनी ३२ लाख २२ हजार ८६३ रुपये गुंतवले होते.

> आरोपी संतोष विश्वकर्मा आणि मीरा शर्मा हे दोघे गुन्हा घडल्यापासून आपले अस्तित्व लपवून वास्तव्य करीत आहेत. त्यांच्याबद्दल कोणाला काही माहीत असल्यास नालासोपारा पोलिस ठाण्याशी किंवा माझ्याशी संपर्क साधावा.
>
> \- सचिन कोतमिरे, तपास अधिकारी व पोलिस निरीक्षक, नालासोपारा पोलिस ठाणे

# गृहनिर्माण संस्थेला जमीन न देणाऱ्या बिल्डरवर गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : गृहनिर्माण संस्थेला इमारतीची जमीन हस्तांतरित करून न देणाऱ्या विकासकावर मीरा रोड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

मीरा रोडच्या शीतलनगर येथे शीतल रेजन्सी मनोर ही सोसायटी आहे. ही इमारत एस.एस. डेव्हलपर्सचे चंदूभाई सी. पटेल व एस.सी. पटेल या भागीदारांनी बांधलेली आहे.

## हस्तांतरण बंधनकारक

गृहनिर्माण संस्थेची नोंदणी झाल्यावर कायद्यानुसार ४ महिन्यांच्या आत इमारत व आराखडा मंजूर असलेली जमीन सोसायटीच्या नावाने हस्तांतरित करणे बंधनकारक आहे; परंतु जमीन सोसायटीच्या नावावर विकासकाने हस्तांतरित करून दिलेली नाही. याप्रकरणी या इमारतीतील सलमान कुरेशी यांच्या फिर्यादीवरून मीरा रोड पोलिसांनी चंदूभाई सी. पटेल व एस.सी. पटेल या दोघांवर मोफा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# दोन अल्पवयीन मित्रांचे अपहरण

नालासोपारा : वसईच्या भोयदापाडा परिसरात राहणाऱ्या १३ आणि १४ वर्षांच्या दोन मित्रांचे २० एप्रिलला रात्री अपहरण झाले आहे. अनोळखी आरोपीने त्यांचा अल्पवयीन असल्याचा फायदा घेऊन आमिष दाखवून फूस लावून पळवून नेले आहे. मुलाच्या आईने मंगळवारी वालीव पोलिस ठाण्यात तक्रार देऊन अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. वालीव पोलिस अधिक तपास करीत आहेत.

CamScanner

लोकमत पृ.पान.क्र.1

## तरुणीवर अत्याचार



नालासोपारा : विरार परिसरात राहणाऱ्या २७ वर्षीय तरुणीसोबत आरोपीने मैत्री केली. त्यानंतर तिला लग्नाचे आमिष दाखवून वारंवार वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन बलात्कार केल्याने पीडित तरुणी ५ महिन्यांची गर्भवती राहिली आहे. तसेच पीडित तरुणीकडून वेळोवेळी पैशांची अडचण आहे असे सांगून ३५ हजार ७२२ रुपये घेऊन आर्थिक फसवणूकही केली आहे. लग्न कर म्हणून पीडित तरुणीने आरोपीला बोलल्यावर त्याने बघून घेण्याची धमकी दिली आहे. विरार पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## तरुणाची फसवणूक

नालासोपारा : फादरवाडीच्या कसारपाडा येथील शर्मा चाळीत राहणाऱ्या शशिकांत यादव (वय २५) या तरुणाची ३० जानेवारी २०२३ ते २३ एप्रिलदरम्यान फसवणूक झाली आहे. पंचवटीच्या शिवदर्शन अपार्टमेंटमधील एस. आर. मोटर्स या ऑफिसमध्ये मदन पंडियन (४२), प्रियंका पंडियन (३२) या दोघांनी शशिकांतचा विश्वास संपादन करून दुचाकी वाहनाचे १ लाख १३ हजार रुपये घेतले. नवीन गाडीचे रजिस्ट्रेशन न करता शशिकांतकडून पैसे घेऊन आर्थिक फसवणूक करत रकमेचा अपहार केला . माणिकपूर पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पृ.पा.क्र.2

## पैशांची बॅग कारमधून चोरली

नालासोपारा : खरेदीसाठी गेल्यानंतर दुकानाबाहेर पार्क केलेल्या कारमधील पैशांची बॅग चोरीला गेल्याप्रकरणी वसई पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. वसईच्या श्रीफल बिल्डिंगमधील गणेश गौढा (५२) हे सोमवारी दुपारी त्यांच्या पत्नीसह बाभोळा येथील विजय सेल्समध्ये मुलीच्या लग्नाच्या खरेदीसाठी गेले होते. त्यांनी कार या दुकानाच्या बाहेर पार्क केली होती. यावेळी तीन चोरट्यांनी त्यांच्या गाडीची समोरील डाव्या बाजूच्या दरवाजाची काच तोडून १ लाखांची रोख रक्कम ठेवलेली पैशांची बॅग चोरून नेली.

लोकमत पृ.पान क्र.3

## मशिनरी, उपकरणे चोरीला

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : लाखोंची मशिनरी तसेच उपकरणे चोरीला गेल्याची घटना वसईत घडली आहे. वालीव पोलिसांनी सोमवारी गुन्हा दाखल केला आहे.

ऐरोलीच्या ऋचा अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या अनमोलसिंग बामरा (५७) यांनी वसईच्या रेंज नाका येथील शिवसमन इंडस्ट्रियल इस्टेट येथे गाळा नंबर २ भाडेतत्त्वावर घेतला होता. प्रवीणचंद्र शहा, विनोदचंद्र शहा, जगत शहा या तिघांनी अनमोलसिंग यांनी घेतलेल्या गाळ्याचा जबरदस्तीने ताबा घेतला. त्या गाळ्यातील अनमोलसिंग यांच्याकडे असलेल्या पावत्यांनुसार अंदाजे १२ लाख रुपये किमतीचे मशिनरी व उपकरणे लबाडीने चोरून नेल्या आहेत.

## तुळींजला वीजचोरीचा गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : संतोष भवनच्या हवाईपाडा येथील रमेश पवार या वीज ग्राहकाने वीज वितरण कंपनीची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे वीजचोरी करून ४६७८ युनिट विजेचा वापर करत १ लाख १८ हजार ९७० रुपयांचे आर्थिक नुकसान केले आहे. याप्रकरणी महावितरणचे तबसून सय्यद (३८) यांनी सोमवारी तुळींज पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

पुढारी पु० पान.क्र.१

# नालासोपारात दुचाकी, रिक्षा चोरटा गजाआड

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

दुचाकी आणि रिक्षा चोरणाऱ्या आरोपीला अटक करण्यात माणिकपूरच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना यश मिळाले आहे. पोलिसांनी आरोपीकडून ४ गुन्ह्यांची उकल करून २ लाख रुपये किमतीचे ३ दुचाकी आणि १ रिक्षा असा मुद्देमाल हस्तगत केली आहे.

नायगांवच्या पूर्वेकडील टीवरी रोडवरील भामनी संकुल येथे राहणारे दिलीपकुमार मकवांना (४३) यांची नायगांव रेल्वे स्टेशन जवळील सार्वजनिक रस्त्यावर पार्किंग केलेली दुचाकी १६ एप्रिलला चोरीला गेली होती. त्यांच्या तक्रारीवरून माणिकपूर पोलिसांनी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला होता. माणिकपूरच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलीस अधिकारी व अंमलदारांनी आरोपी मोहम्मद सैयाज मनिहार (२४) याला बावशेतपाडा परिसरातून सापळा रचून अटक केली. अटक आरोपीकडून २ लाख रुपये किमतीचे ३ दुचाकी व १ रिक्षा हस्तगत करून चार गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळाले आहे. ही कारवाई पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रृंगी, सहा. पोलीस आयुक्त पद्मजा बडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि राजू माने, संतोष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## दोन टीव्ही चोरीला

**पालघर :** विराटी परिसरातील एका इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या दुकानातून दोन टीव्ही चोरीस गेल्याची घटना घडली आहे. अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे शटर तोडून दोन्ही टीव्ही पळवले. याबाबत गुरुवारी नायगाव पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अपघातात एक ठार

**पालघर :** पेल्हार पोलीस ठाणे क्षेत्रातील नायरा पेट्रोल पंप परिसरात भरधाव वाहनाने धडक दिल्यामुळे विनोद डोंगरे यांचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी घडली. ते धानिवबाग हरवटेपाडा परिसरात राहत होते. याप्रकरणी वाहन चालका विरोधात गुन्हा नोंद झाला आहे.

## तरुणीवर अत्याचार

**पालघर :** एका ३५ वर्षीय तरुणीला लग्नाच्या आमिषाने अत्याचार केल्याची घटना आचोळे पोलीस ठाणे क्षेत्रात घडली आहे. तरुणाने तिचा विश्वास संपादन करत तिला लग्नाचे आमिष दाखवले. असे करत असताना दरम्यान त्याने वेगवेगळ्या ठिकाणी बोलून तिच्यासोबत संबंध ठेवले. तरुणीने लग्नाची विचारणा केली असता त्याने नकार दिला व तिची फसवणूक केली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

## तरुणाकडून ड्रग्ज जप्त

**पालघर :** एका २१ वर्षीय तरुणाकडून तुळींज पोलिसांनी तब्बल पाच लाख ३५ हजार रुपयांच्या जवळपासचा एमडी हा ड्रग्ज सदृश्य अमली पदार्थ हस्तगत केला आहे. शाबन आलम असे या व्यक्तीचे नाव असून प्रगतीनगर भागातून शनिवारी या तरुणाची झडती घेतली असता त्याच्याकडे ५४ ग्रामच्या आसपासचा एमडी पोलिसांना आढळून आला. पोलिसांनी याविरोधात तुळींज रविवारी गुन्हा दाखल केला आहे.

## दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पालघर :** भरधाव ट्रकने दिलेल्या धडकेमध्ये दुचाकी चालकाचा मृत्यू झाल्याची घटना नायगाव पोलीस ठाणे हद्दीतील मुंबई-अहमदाबाद महामार्गावर घडली आहे. मीरा रोड येथील योगेश शहा हे महामार्गावरून दुचाकीने जात असताना भरधाव वेगाच्या ट्रकने दुचाकीला ठोकर दिल्याने झालेल्या अपघातात योगेश यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी नायगाव पोलिसांनी ट्रकचालक चव्हाण याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

पुढारी पान क्र. ३

# मिरा भाईंदरमध्ये 28 इमारती धोकादायक

## स्ट्रक्चरल ऑडिटच्या नोटिसांकडे सोसायट्यांनी फिरवली पाठ

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मीरा भाईंदर शहरातील पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तीस वर्षांहून अधिक जुन्या व मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतीचे सर्वेक्षण महापालिकेकडून करण्यात आले आहे. सर्वेक्षण केल्यानंतर धोकादायक आढळून आलेल्या इमारतींना संरचनात्मक परिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करून घेण्याच्या नोटिसा महापालिकेने बजावल्या होत्या. नोटिसा पाठवल्यानंतर त्यातील काही इमारतींनीच स्ट्रक्चरल ऑडिट करून त्याचा अहवाल महापालिकेला सादर केला आहे.तर अनेक सोसायट्यांनी स्ट्रक्चरल ऑडिटच्या नोटिसांकडे पाठ फिरवली आहे. महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात २८ इमारती सी-१ श्रेणीतील म्हणजेच अतीधोकादायक व राहाण्यास अयोग्य आढळून आले आहे.

मीरा भाईंदर शहरात अनेक जुन्या इमारती आहेत. पावसाळ्यात धोकादायक इमारती पडून अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे महापालिकेकडून खबरदारी घेतली जाते व विविध उपाययोजना केल्या जातात. महापालिका क्षेत्रातील मिरारोड व भाईंदर पश्चिमेला अनेक जुन्या इमारती आहेत. यातील काही धोकादायक मोकळ्या इमारती



कोसळल्याची घटना घडल्या आहेत. तर, नागरिक राहत असलेल्या काही जुन्या इमारतींचा भाग कोसळला आहे. या पार्श्वभूमीवर, नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अतिधोकादायक व धोकायदायक इमारतींची यादी पालिकेकडून पावसाळ्यापूर्वी दरवर्षी प्रसिद्ध करण्यात येते. महापालिकेने शहरातील मोडकळीस आलेल्या १,६४८ इमारतींना स्ट्रक्चरल ऑडीटच्या नोटीसा पाठवल्या आहेत. यापैकी फक्त ५२० इमारतींनीच ऑडीट करून महापालिकेला अहवाल सादर केला आहे. ज्या ५२० इमारतींनी स्ट्रक्चरल ऑडीटचा अहवाल सादर केला आहे. त्यापैकी २८ इमारती 'सी-१' श्रेणीतील म्हणजेच अतीधोकादायक व रहाण्यास अयोग्य आहेत. त्यातील अतिधोकादायक चार इमारती महापालिकेने तोडल्या आहेत तर सात इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत, दोन इमारती तोडण्याचे काम सुरु आहे.

- दोन इमारतींचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, तर उर्वरित धोकादायक इमारती पाडण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे. या इमारतींची वेळीच देखभाल दुरुस्ती न केल्यास भविष्यात अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आता प्रथमतः देखभाल दुरुस्तीची आवश्यकता वाटणाऱ्या इमारतीचे महापालिकेच्या पॅनलवरील अभियंत्याकडून ऑडिट करण्याचा निर्णय आयुक्त संजय काटकर यांच्याकडून नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे दुरुस्तीच्या सूचना सोसायट्यांना दिल्या जाणार आहे. तसेच ज्या इमारतीचे ऑडीट झालेले नाही अशा इमारतींचे ऑडिट मनपाने आता स्वतःच करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच त्याचा खर्च संबंधित इमारतीकडून वसूल करावा किंवा संबंधित सोसायटीच्या मालमत्ता करदेयकात जोडून वसूल करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.

पुढारी पान क्र. ५

# भरधाव टँकरच्या वाहतुकीला लगाम

**नालासोपारा :** वसई- विरार शहरात बेदरकारपणे भरधाव टँकर चालवल्याने अपघातांमध्ये वाढ झाली होती. गेल्या वीस दिवसांमध्ये विविध दुर्घटनांमध्ये तीन जणांचा मृत्यू झाला. यानंतर आता विरार वाहतूक पोलिसांना उशिराने जाग आली असून तिघांचे बळी गेल्यानंतर आता कुठे वाहतूक पोलिसांना जाग आली आहे. वाहनचालकांकडे वाहन परवाना, हेल्मेट तसेच सीग्रल तोडल्याचे कारण शोधत दंडात्मक कारवाई करणारी पोलीस यंत्रणा ज्या ठिकाणी वाहतूक कोंडी होते त्याठिकाणी दिसून येत नाही यामुळे पोलीस प्रशासनाबाबत नागरिक नेहमीच नाराजी व्यक्त करतात. दरम्यान टँकरच्या बेदरकारपणाला आवर घालण्यासाठी पुन्हा एकदा विरार वाहतूक पोलिसांनी कारवाईची मोहीम तीव्र केली असून पहिल्याच दिवशी ८ टँकरवर कारवाई केली आहे. वसई विरार शहरात टँकर चालक हे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून वाहने चालवितात. त्यामुळे टँकर अपघाताच्या घटना समोर येत आहे. याआधी अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांनी टँकर चालक मालक यांच्या बैठका घेतल्या होत्या मात्र अवघे काही दिवस नियमांचे पालन होते.

CamScanner

पुढारी पान क्र. ५

# हरवलेले २० मोबाईल नागरिकांच्या स्वाधीन

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

मोबाईल म्हणजे आजकाल माणसाचा जीवनसाथी झाला आहे. एकदा मोबाईल हरवला की तो पुन्हा परत मिळण्याची आशाच सोडून दिली जाते. एवढ्या प्रचंड लोकसंख्येत पोलिस तरी कसा शोध लावणार या निष्कर्षावर नागरिक येतात. पण तंत्रज्ञान एवढे विकसित झाले की कुठलीही गोष्ट अशक्य नाही. अनेकदा मोबाईल हरवल्यानंतर तो परत मिळण्याची शाश्वती नसते. ही शक्यता पेल्हार पोलिसांनी खोडून काढली आहे. मंगळवारी सकाळी चोरी, गहाळ झालेले २० मोबाईल पेल्हार पोलिसांनी नागरिकांना परत केले आहे.

पेल्हार पोलीस ठाण्याच्या परिसरात गेल्या काही दिवसांत मोबाईल चोरीच्या घटना वाढल्या आहेत. चोरीला तसेच हरवलेले मोबाईल शोधणे हे देखील पोलिसांच्या समोर एक मोठे आवाहन असते. पेल्हार पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी लाखो रुपये किंमतीचे एकूण २० मोबाईल शोधून काढले आहे. परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त



## पेल्हार पोलिसांच्या शोध मोहिमेला यश

जयंत बजबळे यांच्या हस्ते मंगळवारी पोलीस ठाण्यात आयोजित केलेल्या कार्यक्रमात मालकांना परत देण्यात आले. यावेळेस नागरिकांना सायबर गुन्हेगारी, मोबाईल चोरीपासून कसे वाचावे आणि मोबाईल आणि सकाळी पोलीस ठाण्यात आयोजित केलेल्या कार्यक्रमात मालकांना परत देण्यात आले. यावेळेस नागरिकांना सायबर गुन्हेगारी, मोबाईल चोरीपासून कसे वाचावे आणि मोबाईल आणि डेटा सुरक्षित कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले. मोबाईल परत मिळाल्याने, अनेकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले. मोबाईल परत मिळाल्यानंतर लोकांनी पोलिसांचे आभार मानले आहे. गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलिसांनी अथक मेहनत करून मोबाईलचा शोध लावला आहे.

सदरची कामगिरी पोलीस उपायुक्त जयंत भजबळे, सहायक पोलीस आयुक्त बजरंग देसाई यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) कुमार गौरव धादवड, पोलीस निरीक्षक (प्रशासक) शकील शेख, गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि सोपान पाटील, पोलीस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे, पोलीस हवालदार योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, रवि वानखेडे, किरण आव्हाड, मिथुन मोहिते, निखिल मंडलिक, संजय मासाळ, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील यांनी केली आहे.

म.टा. पु. पान क्र. १

# हॉटेल मॅनेजरला बिलावरून मारहाण

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

बिल मागितल्याच्या कारणावरून हॉटेलच्या मॅनेजरला मारहाण करण्यात आली आहे. ही घटना सोमवारी मध्यरात्रीची असून मारहाण करणाऱ्या तिघांवर काशिमिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

मिरा-भाईंदर रोडवर असणाऱ्या गंधर्व बारमध्ये समाधान माळी हे सोमवारी रात्री मद्यपान करण्यासाठी बसले होते. यावेळी त्यांनी केलेल्या मद्यपानाच्या बिलाचे पैसे मागण्यांसाठी हॉटेलचे मॅनेजर शंकर यादव गेले. यावेळी माळी यांनी त्यांच्यासोबत वाद घातला, त्यानंतर बिलाचे पैसे अदा करून निघून गेले. मध्यरात्री बार बंद करून शंकर घरी जात असताना त्यांना सिल्वर पार्कजवळ माळी व त्याच्या सहकाऱ्यांनी अडवले. त्यानंतर बिलाचे पैसे मगितल्याच्या


चित्र : एआय



कारणावरून माळी व त्यांच्या दोन सहकाऱ्यांनी शंकर यांना लोखंडी रॉड व ठोसे-बुक्के देत मारहाण केली. या मारहाणीत शंकर जखमी झाल्याने त्यांनी काशिमिरा पोलिस ठाण्यात मंगळवारी तक्रार दाखल केली होती. त्यावरून समाधान् माळी, प्रमोद तळेकर व यश यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

लोकसत्ता पृ.५/७ क्र.१



# प्रदूषणाच्या विळख्यात मधुबन परिसर

## क्राँक्रीट प्रकल्पांमुळे नागरिकांना श्वसनाचा त्रास

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** महामार्गावरील प्रदूषणकारी सिमेंटच्या (आरएमसी) प्रकल्पांप्रमाणे आता शहराच्या अनेक भागात असे प्रकल्प सुरू झाले आहेत. वसई पूर्वेच्या मधुबन परिसरात तब्बल आठ आरएमसी प्रकल्प आहेत. या प्रकल्पांमुळे होणाऱ्या प्रदूषणाच्या विळख्यात येथील नागरिक सापडले आहेत.

वसई पूर्वेला मधुबन परिसर शांत आणि मोकळ्या हवेचा म्हणून ओळखला जातो. मात्र आता या परिसराला प्रदूषणाचा विळखा बसू लागला आहे. परिसरात तब्बल आठ आरएससी प्रकल्प (रेडी मिक्स काँक्रीट) उभे राहिले आहेत. या प्रकल्पांमधून मोठ्या प्रमाणात धुळीकण तयार होऊन ते सर्व परिसरात पसरतात. त्यामुळे श्वसनाचे विकार होतात. प्रकल्पामधून निघणारा कचरा नाल्यांमध्ये टाकला जातो. त्यामुळे नाले प्रदूषित होत आहेत. वारंवार तक्रारी करूनही या कुठलीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे शहरात जल, वायु प्रदूषण वाढले आहे. दरम्यान, मधुबन परिसरातील आरएमसी प्रकल्पाची पाहणी करून त्यावर योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले जातील, असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी आनंद काटोळे यांनी सांगितले.

### महामार्गावरील प्रकल्पही सुरुच

**मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील सहा आरएमसी प्रकल्प आहेत. या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत आहेत. येथील सर्व परिसर धूळमय झाला आहे. महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने या प्रकल्पांची तपासणी करून ते बंद करण्याचे निर्देश वसई-विरार महानगरपालिकेला दिले होते. मात्र वर्ष उलटले तरी अद्याप कुठलीही कारवाई झालेली नाही**

# पोलिसाच्या धमकीमुळे तरुणाची आत्महत्या

## मानवाधिकार आयोगाकडून दखल

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** पोलिसांच्या धमकीमुळे तरुणाने केलेल्या आत्महत्या प्रकरणाची राज्य मानवाधिकार आयोगाने दखल घेतली आहे. या प्रकरणी ६ मे रोजी पोलीस आयुक्तांना मानवाधिकार कार्यालयात स्पष्टीकरण देण्यास बोलावण्यात आले आहे.

विरार पूर्वेच्या मनवेलपाडा येथे अभय पालशेतकर (२८) हा पत्नी आरोही (२५) हिच्यासोबत रहात होता. त्यांच्यात कौटुंबिक वाद होते. २१ एप्रिल रोजी पत्नीने तक्रार दिल्यानंतर पोलिसांना अभयला पोलीस ठाण्यात बोलावले होते. यावेळी सुनिल पवार नामक पोलिसांनी अभयला दमदाटी करून थर्ड डिग्री वापरण्याची धमकी दिली होती. भीतीने त्याने आत्महत्या केली. चित्रफितीत पत्नीचा त्रास आणि पोलिसाच्या धमकीमुळे आत्महत्या करत असल्याचे सांगितले होते. विरार पोलिसांनी अभयच्या पत्नीवरच गुन्हा दाखल केला आणि पोलिसांची फक्त विभागीय चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. याच्या संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या.

CamScanner

लोकसत्ता पृ.पान.५

# छायाचित्रे चोरून संचालिकेला बदनामीची धमकी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई/भाईंदर :** एका संस्थेच्या संचालिकेच्या मोबाइलमधून छायाचित्रे चोरून त्यांना बदनामीची धमकी देऊन 'ब्लॅकमेल' करण्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी संस्थेच्या सल्लागारासह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संस्थेच्या संचालिकेला १३ एप्रिल रोजी कुरियरने एक धमकीचे पत्र आले होते. या प्रकारामागे संस्थेचे सल्लागार असल्याचा संशय संचालिकेने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत व्यक्त केला. यावरून पोलिसांनी संस्थेच्या सल्लागारासह तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

महिलेच्या तक्रारीवरून आम्ही तीन जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक धीरज कोळी यांनी दिली.

CamScanner

# 25 मकान मालिकों के खिलाफ केस दर्ज

हिंदमाता संवाददाता @ नालासोपरा

तुलिंज पुलिस स्टेशन की सीमा के भीतर प्रगतिनगर और मोरेगांव क्षेत्रों में बड़ी संख्या में विदेशी नागरिक घरों को किराए पर लेकर रहे हैं। विदेशी अधिनियम, 1946 की धारा 7 के तहत, किसी भी विदेशी को किसी भी घर/होटल में और व्यावसायिक आधार पर रहने की अनुमति दी जाती है। लेकिन, मकान मालिक, होटल संचालक को 24 घंटे के अंदर सी फॉर्म भरकर स्थानीय पुलिस को सूचित करना अनिवार्य है कि विदेशी नागरिक उनके यहां रहने आया है। ऐसा नहीं करने पर उनके खिलाफ मामला दर्ज करने का प्रावधान है। तदनुसार, पुलिस आयुक्त मीरा-भायंदर, वसई-विरार ने सीआरपीसी 1973 की धारा 144 (1) (2) के तहत निषेधाज्ञा पारित की। पुलिस उपायुक्त (मुख्यालय) द्वारा किरायेदार निषेध आदेश पारित करने के बाद, पुलिस ने समाचार पत्रों और पोस्टरों के माध्यम से समाज में जागरूकता पैदा की थी। फिर भी, चूंकि घर के मालिकों ने पुलिस स्टेशन को इस बात की सूचना नहीं दी कि विदेशी लोग उनके यहां किराए पर रहने आए थे। कुल 25 घर मालिकों के खिलाफ तुलिंज पुलिस स्टेशन में मामला दर्ज किया गया और घर मालिकों को गिरफ्तार कर अदालत में पेश किया गया। इसलिए उक्त गृह मालिकों के विरुद्ध न्यायालय में आरोप पत्र दाखिल कर आरोपित गृह स्वामियों को कारावास व जुमार्ना भुगतना होगा। इसलिए सभी नागरिकों को किरायेदार रखते समय अपनी सारी जानकारी पुलिस थाने में देनी चाहिए। साथ ही विदेशी नागरिकों को किराए पर घर देते समय सी फॉर्म भरना अनिवार्य है।

CamScanner

# हत्या के आरोप में फरार चल रहे वांछित आरोपी 34 साल बाद गिरफ्तार

**भायंदर:** एक हत्या के प्रकरण में फरार चल रहे वांछित आरोपी को लगभग 34 साल बाद मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय की क्राइम ब्रांच (यूनिट 1) की टीम ने मुंबई से गिरफ्तार किया।

पुलिस से मिली जानकारी के अनुसार घटना की पूरी कहानी यह है की मुख्य साजिशकर्ता स्टिव डेविड रिश्ते में मृतक गैब्रियल अमन्ना का सगा जीजा था और स्टिव अपनी पत्नी यानि गैब्रीयल की बहन को रोज प्रताड़ित करता था, जिसका कड़ा विरोध गैब्रियल ने किया था,तभी से जीजा अपने साले से बदला लेने की फिराक में था।

चूंकि अमन्ना परिवार का एक फ्लैट काशीमिरा के मीरा गाँव में भी था,और मृतक के भाई की शादी तय हो गई थी,जिसके उपलक्ष्य में अमन्ना परिवार ने मीरा गाँव स्थित अपने फ्लैट में 2 दिसम्बर 1990 को एक पारिवारिक समारोह रखा था,जिसमें स्टिव डेविड को भी आमंत्रित किया गया था,घटना की रात उक्त पार्टी में स्टिव अपने साथ कुछ आपराधिक प्रवृति के दोस्तों को भी साथ ले गया था,और नशे में उसने अपनी पत्नी के साथ गाली गलौज करने के साथ ही गैब्रियल के भाई के साथ भी मारपीट की तभी बीच-बचाव करने आए गैब्रियल पर स्टिव और उसके साथियों ने धारदार हथियारों से हमला कर उसे बुरी तरह जख्मी कर भाग गये थे,तुरंत ही अमन्ना ब्रदर्स गैब्रियल को अस्पताल ले गये जहाँ पर डॉक्टरों ने उसे मृत घोषित किया।

उपरांत मृतक के भाई रेनोल्ड अमन्ना की शिकायत पर पुलिस ने हत्या के जुर्म में दफा 302 के तहत मामला दर्ज कर स्टिव डेविड सहित पांच आरोपियों को गिरफ्तार कर लिया था,पर पेशे से रिक्शा ड्राइवर नामजद आरोपी जहाँगीर तभी से फरार था। ज्ञात हो की पुलिस आयुक्तालय की सीमा में गंभीर प्रकार के जुर्म में फरार आरोपियों को ढूंढने का आदेश पुलिस कमिश्नर मधुकर पांडे ने दिया हुआ है,इसी कड़ी में यूनिट(1) के पुष्पेंद्र थापा को उनके सूत्रों के माध्यम से सुचना मिलने पर वरिष्ठ पुलिस निरीक्षक अविराज कुराडे के नेतृत्व में पुलिस दल ने 22 अप्रैल को अँधेरी (पू.) से फरार आरोपी जहाँगीर शेख को

CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष : 27 अंक-306 मुंबई, गुरुवार 25 अप्रैल 2024 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# विदेशी नागरिकों को घर किराये पर देने से पहले पूलिस को करें सूचित, नहीं तो खानी पड़ेगी जेल की हवा

**वसई :** तुलिंज पुलिस स्टेशन की सीमा के भीतर (मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय) प्रगतिनगर और मोरेगांव क्षेत्रों में, बड़ी संख्या में विदेशी नागरिक इन घरों को किराए पर ले रहे हैं। विदेशी अधिनियम, 1946 की धारा 7 के तहत, किसी भी विदेशी को किसी भी घर/होटल में और व्यावसायिक आधार पर रहने की अनुमति दी जाती है। लेकिन, मकान मालिक, होटल संचालक को 24 घंटे के अंदर 'सी फॉर्म' भरकर स्थानीय पुलिस को सूचित करना अनिवार्य है कि विदेशी नागरिक उनके यहां रहने आया है। ऐसा नहीं करने पर उनके खिलाफ मामला दर्ज करने का प्रावधान है. तदनुसार, पुलिस आयुक्त मीरा-भाईंदर, वसई-विरार ने सीआरपीसी 1973 की धारा 144 (1)(2) के तहत निषेधाज्ञा पारित की। पुलिस उपायुक्त (मुख्यालय) द्वारा किरायेदार निषेध आदेश पारित करने के बाद, पुलिस ने समाचार पत्रों और पोस्टरों के माध्यम से समाज में जागरूकता पैदा की थी। फिर भी, चूंकि घर के मालिकों ने पुलिस स्टेशन को इस बात की सूचना नहीं दी कि विदेशी लोग उनके यहां किराए पर रहने आए थे, कुल 25 घर मालिकों के खिलाफ तुलिंज पुलिस स्टेशन में मामला दर्ज किया गया और घर मालिकों को गिरफ्तार कर अदालत में पेश किया गया। इसलिए उक्त गृह मालिकों के विरुद्ध न्यायालय में आरोप पत्र दाखिल कर आरोपित गृह स्वामियों को कारावास व जुर्माना भुगतना होगा. इसलिए सभी नागरिकों को किरायेदार रखते समय अपनी सारी जानकारी पुलिस थाने में देनी चाहिए। साथ ही विदेशी नागरिकों को किराए पर घर देते समय 'सी फॉर्म' भरना अनिवार्य है।




CS CamScanner